सं.फौ.ख.क्र. १०४६/२०२२



सरकार वि. शेख युसुफ

निशाणी क्र. १८

**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक ३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – पल्लवी अश्वीन नाकाडे

वय – ३१ वर्ष, व्यवसाय – शेती

राहणार – बोरी सिंगुरी, ता. पारशिवनी, जिल्हा नागपूर

**<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता एस.व्ही. रामटेके यांच्यातर्फे</u>**

१. घटना दि.१२/०६/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता पारशिवनी रोडवर घडली होती. त्यादिवशी मी व माझे पती अश्वीन नाकाडे मोटरसायकल ने बोरी वरुन पारशिवनी माझ्या मावशी कडे जात होतो. आम्ही एका बाजूला मोटरसायकल थांबवून उभे होतो. त्यावेळी एक ट्रक एम.एच.–४०–एन.–४२५३ ने अचानक आमच्या मोटरसायकल ला धडक दिली व डिव्हायडरला घासत जाऊन तेथून पसार झाला. सदर धडक दिल्याने मी बेशुध्द पडले. त्या घटनेमध्ये माझ्या डाव्या पायाला व उजव्या हाताला गंभीर दुखापत झाली. तसेच माझ्या पतीला डोक्याला, छातीला व पायाला जखम झाली होती. त्यानंतर माझ्या पतीने घरच्यांना फोन करुन घटनेबाबत माहिती दिली. घटनास्थळावरील लोकांनी आम्हाला आशा हॉस्पीटल येथे भरती केले. त्याच दिवशी पोलीस हॉस्पीटल ला आले व आमचे बयान नोंदविले.

**सरतपास पूर्ण**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे वकील रिना गणवीर यांच्यातर्फे.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की घटनेच्या वेळी मी बेशुध्द पडल्याने मला काय घडले हे माहित नाही. पोलीसांना बयान देतांन मी 'त्यादिवशी मी व माझे पती अश्वीन नाकाडे मोटरसायकल ने बोरी वरुन पारशिवनी माझ्या मावशी कडे जात होतो व सदर ट्रक डिव्हायडरला घासत जाऊन तेथून पसार झाला' असे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की माझे पतीने चुकीच्या बाजूने गाडी चालवित होते. हे म्हणणे खरे नाही की सदर अपघात माझ्या पतीच्या चुकीमुळे झाला. हे म्हणणे खरे नाही की घटनेमध्ये मला व माझ्या पतीला दुखापत झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की घटनेच्या वेळी मी ट्रकचा नंबर बघितला नव्हता. हे म्हणणे

खरे नाही की ट्रकचा क्रमांक मी माझे बयान वाचून आजरोजी सांगितला आहे. मी नुकसान भरपाई मिळण्याकरीता प्रकरण दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की नुकसान भरपाई मिळण्याकरीता मी सदरची खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला खोटया केस मध्ये फसवित आहे. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2024.07.05 14:03:23 +0530

ठिकाण —कामठी **(रा.र. शेरेकर)**

दिनांक —०५/०७/२०२४ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.